MHAU120001912021

**नियमित दिवाणी दावा क्र.–४२/२०२१**
**रविंद्र वि. गणेश**

## <u>निशाणी ५ खाली आदेश</u>

**०१.** प्रस्तुतचा अर्ज हा वादीने आदेश ३९ नियम १ व २ दिवाणी प्रक्रिया संहिता,१९०८ नुसार दाखल केला आहे.

**०२.** वादीने असे कथन केले आहे की, तो मौजे पळाशी, ता. सोयगांव येथील शेतजमीन गट क्र. ९७ एकुण क्षेत्रफळ ४ हेक्टर ९ आर ज्याच्या चतुःसिमा पुढीलप्रमाणे पुर्वेस–नाला, पश्चिमेला–शिवाजी मोतीराम मोटे यांची शेती, दक्षिणेला–मुरलीधर राजाराम क–हाळे यांची गट क्र.९७ मधील शेती, उत्तरेला–कापुरा नदी या शेतजमीनीचा मालक व ताबेदार आहे. सदर मालमत्ता ही दाव्याचा विषय असुन या मालमत्तेस यापुढे 'वादमिळकत' असे संबोधण्यात येईल.

**०३.** वादीने पुढे असे कथन केले आहे की, वादी व प्रतिवादी हे एकाच भावकीतले असुन वादी व त्याच्या कुटुंबियांविरुध्द प्रतिवादींनी खोटया तक्रारी दाखल केल्या आहेत. प्रतिवादी हे एकमेकांचे नातलग असुन ते वादीस जमीनीतुन बेदखल करु पाहत आहेत. तसेच ते वादमिळकतीवर ताबा करण्याचा प्रयत्न करीत आहे. वादी हा दि. ०३.०६.२०२१ रोजी वादग्रस्त शेतीची मशागत करीत असतांना सर्व प्रतिवादी संगनमताने तेथे आले व त्यांनी वादीच्या ताब्याला अडथळा निर्माण केला. त्यामुळे त्यांनी सदरचा दावा न्यायालयात दाखल केला असुन त्यामध्ये त्यांना तात्पुरता मनाई हुकुम मिळावा अशी विनंती केली आहे.

**०४.** प्रतिवादींनी त्यांचा जवाब **<u>नि.क्र.–२७</u>** वर दाखल केला आहे. त्यामध्ये त्यांनी वादीने केलेली कथने नाकारली आहेत. त्यामध्ये पुढे असे कथन केले आहे की, दामु

तोताराम व अर्जुन तोताराम क–हाळे यांनी मौजे पळाशी येथील सर्वे नं. ५४/१ व ५४/२ मध्ये एकुण १२ हेक्टर १४ गुंठे शेतजमीन विकत घेतली होती. तसे खरेदीखत दि. ३१.१२.१९६९ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय, भोकरदन येथे करण्यात आले होते. त्यानुसार फेरफार क्र.–५३३ नुसार नोंदी सुध्दा घेण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे त्या दोघांनी प्रत्येकी ६ एकर ७ गुंठे शेतजमीन वाटुन घेतली होती व ते त्या जमीनीचा उपभोग घेत होते. सर्वे नं. ५४/१ व ५४/२ चे रुपांतर गट क्र. ९७ मध्ये झालेले आहे.

**०५.** सर्वे नं. ५४/१ व ५४/२ मधील १२ एकर १४ गुंठे शेतजमीनीचे गट क्र. ९७ मध्ये रुपांतर झाले तेव्हा ४ हेक्टर ९४ आर क्षेत्र नमुद व्हायला पाहिजे होते. परंतु, गट एकत्रीकरण सन १९७७–७८ योजनेच्या गट स्टेटमेंटला सर्वे नं. ५४/१ ला २४ आर व सर्वे नं. ५४/२ ला ३ हेक्टर ८५ आर असे चुकीचे क्षेत्रफळ नमुद केले गेलेले आहे. चुकीने गट क्र. ९७ मध्ये ४ हेक्टर ९० आर ऐवजी ४ हेक्टर ९ आर अशी नोंद सन २०१४ पर्यंत दिसुन येते. परंतु, सन २०१५ पासुन गट क्र. ९७ च्या सातबारा उता–यामध्ये प्रतिवादी क्र. १ ते ७ चे वडिल दामु तोताराम क–हाळे यांच्या नावावर ८० आर क्षेत्र सातबारा उता–यावर दिसुन येत नाही. सदर ८० आर शेतजमीन ही प्रतिवादींचे वडिल कसत होते. त्यानंतर प्रतिवादी क्र. १ ते ९ हे सदर शेतजमीनीचा विना हरकत उपभोग घेत आहे.

**०६.** प्रतिवादी क्र. १ यांनी संबंधीत जुने अभिलेख काढुन गट क्र. ९७ च्या क्षेत्रफळ दुरुस्ती कामी मा. उपसंचालक भुमी अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे अपिल अर्ज दाखल केला आहे. त्यांनी दिलेल्या पत्रानुसार प्रतिवादी क्र. १ ते ९ यांनी संबंधीत जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय, औरंगाबाद यांच्याकडे अपिल अर्ज दाखल केला आहे व सदर अपिल अर्ज हा सदर कार्यालयाकडे न्यायप्रविष्ठ आहे. वादी यांना दावा दाखल करण्यास कोणतेही कारण घडलेले नाही. त्यांनी खोटा दावा न्यायालयात दाखल केला आहे. त्यांच्या बाजुने मनाई हुकुम दिल्यास प्रतिवादी यांचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल. त्यामुळे वादी यांचा अर्ज नामंजुर व्हावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

**०७.** वादी व प्रतिवादींनी केलेली कथने त्याचप्रमाणे वादी व प्रतिवादी यांच्या सन्माननीय विधीज्ञांच्या युक्तीवादावरुन सदर अर्ज निकाली काढण्याकरीता खालील मुद्दे निघतात. त्याचे निष्कर्ष व कारणेमिमांसा खालील प्रमाणेः–

| **अ.क्र.** | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| **०१.** | वादींच्या बाजुने प्रथमदर्शनी केस आहे असे वादीने दाखविले आहे का? | **...<u>होय</u>.** |
| **०२.** | वादींच्या बाजुने सोयीचा तोल आहे असे वादीने दाखविले आहे का? | **...<u>होय</u>.** |
| **०३.** | वादींच्या बाजुने मनाई हुकुम न दिल्यास त्यांचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल असे वादीने दाखविले आहे का? | **...<u>होय</u>.** |
| **०४.** | काय आदेश? | **...<u>अंतिम आदेश प्रमाणे</u>.** |

## <u>कारणेमिमांसा</u>

**०८.** दोन्हीं सन्माननीय विधीज्ञांनी त्यांचा युक्तीवाद हा त्यांनी केलेल्या कथनाप्रमाणेच केलेला आहे.

**<u>मुद्दे क्र.– १ ते ३ करीताः</u>–**

**०९.** वादीने असे दाखवणे गरजेचे आहे की, त्यांचा वाद हा खरा असुन त्यामध्ये न्यायालयाने हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या बाजुने प्रथमदर्शनी केस असुन सोयीचा तोल सुध्दा त्यांच्याच बाजुने आहे. त्याचप्रमाणे त्यांना तात्पुरता मनाई हुकुम न दिल्यास त्यांचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होवु शकते. त्याचप्रमाणे

त्यांनी न्यायालयासमोर स्वच्छ हाताने येणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी न्यायालयापासुन कोणत्याही महत्वाच्या बाबी लपविलेल्या नाहीत.

**१०.** वादीने असे कथन केले आहे की, तो वादमिळकतीचा मालक व ताबेदार आहे. वादीने अभिलेखावर गट क्र. ९७ मौजे पळाशी, ता. सोयगांवच्या सातबारा उता–याची प्रत दाखल केली आहे. त्यावरुन असे दिसते की, वादी यांचे नांव वादमिळकती करीता सातबारा उता–यामध्ये नमुद आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, गट क्र. ९७ मध्ये गट एकत्रीकरणाच्या वेळेस चुकीच्या नोंदी झाल्या आहेत. दामु क–हाळे व अर्जुन क–हाळे यांनी गट क्र. ९७ मध्ये एकुण १२ एकर १४ गुंठे शेतजमीन विकत घेतली होती. त्यांनी दाखल केलेल्या खरेदीखतावरुन सदर बाब निश्चित होते, तसा फेरफार सुध्दा अभिलेखावर दाखल आहे. परंतु, असे असले तरी सुध्दा वादी यांचे नांव वादमिळकतीकरीता सातबारा उता–यामध्ये नमुद आहे व त्याला प्रतिवादी यांनी आव्हान दिलेले नाही. तसेच प्रतिवादी यांनी जिल्हा अधिक्षक भुमी अभिलेख, औरंगाबाद तसेच उपसंचालक भुमी अभिलेख, औरंगाबाद यांच्याकडे केलेले अर्ज हे सदर दावा दाखल केल्यानंतर केलेले दिसतात. त्यामुळे गट एकत्रीकरणाच्या वेळेस सातबारा उता–यामध्ये चुकीची नोंद झाल्याबाबत अभिलेखावर काहीही दाखल नाही. त्यामुळे चुकीची नोंद सातबारा उता–यावर झाली असे या क्षणी म्हणता येणार नाही.

**११.** आज रोजी वादी यांचा वादमिळकतीवर ताबा असल्याचे दिसते. त्यामुळे वादी यांच्या बाजुने प्रथमदर्शनी केस आहे असे दिसते. वादी यांची कथने नाकारण्याजोगी कोणतीही बाब प्रतिवादी यांनी अभिलेखावर सादर केलेली नाही. त्यामुळे सोयीचा तोल सुध्दा वादीच्या बाजुने आहे असे दिसते. तसेच वादी यांच्या बाजुने मनाई हुकुम न दिल्यास त्यांचे कधीही न भरुन निघणारे नुकसान होईल असे दिसते. त्यामुळे मी मुद्दे क्र. १ ते ३ होकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.– ४ करीताः</u>–**

**१२.** वरील दिलेल्या कारणमिमांसेवरुन वादी हा तात्पुरता मनाई हुकम मिळण्यास पात्र आहे. त्यामुळे मी खालील आदेश पारीत करीत आहेः–

**आदेश**

**०१.** वादीचा अर्ज निशाणी क्र. ५ हा या अर्जावर पुढील आदेश होईपर्यंत मंजुर करण्यात येत आहे.

**०२.** प्रतिवादी यांनी पुढील आदेश होईपर्यंत वादीच्या ताब्यास अडथळा निर्माण करु नये.

**०३.** खर्चाबाबत कुठलाही आदेश नाही.

Digitally signed by AMOL BHASKAR INGOLE
Date: 2023.05.04 10:15:35 +0530

[अमोल भा. इंगोले]

**दिनांक : ०३.०५.२०२३.**

दिवाणी न्यायाधीश,क.स्तर,
सोयगांव.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per original Order".

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | K. P. Dusane. |
| Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C., Soygaon. |
| Date | :- | 03.05.2023. |
| Order signed by presiding Officer on | :- | 03.05.2023. |
| Order uploaded on | :- | 04.05.2023. |